REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख २५ डिसेंबर, १९४० अंक ५१

सर्व तऱ्हेची कापड, छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

'पायोनियर डाइंग हाऊस'

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—

भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

देशी औषधें तयार करणारा
महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना
पंडु, (अॅनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या
अशक्ततेवर
रक्तवर्धक
वापरा.
सर्वत्र मिळतें.
—ः केंद्रें ः—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.
आयुर्वेद रसशाळा
पुणें, लि. पुणें ४.

"एका चुटकीसरशीं जमवितो चिमीचं लग्न—" असं म्हणणाऱ्या चिमणरावाला लग्न जमवितांना प्रत्यक्ष कोणते बरे अनुभव आले असतील?



ः भूमिका ः
दामुअण्णा मालवणकर
★
लग्न पहावं करून
★ नवयुगचा संपूर्ण मराठी विनोदी बोलपट ★
★
ः दिग्दर्शक ः
विनायक
★
शनिवारपासून सुरू आहे—
मिनर्व्हा—पुणें
न्यू वेस्ट एण्ड—मुंबई
रोज : ४, ७ व १० वाजतां
शनि. रवि. मंगळ. गुरु. जादा खेळ १॥ वाजतां

# विविध माहिती

### बँकांस सुटी

मंगळवार, बुधवार व गुरुवार, ता. २४, २५ व २६ रोजीं नाताळ-निमित्त व मंगळवार ता. ३१ रोजीं वर्षअखेरनिमित्त बँका बंद आहेत.

### व्यापारी जहाजांची अमेरिकेंत ब्रिटिश खरेदी

सुमारें एक कोटि रुपये किंमतीचीं आणि दीड लाख टन वजनाचीं १६ व्यापारी जहाजें ग्रेट ब्रिटननें अमेरिकेंत नुकतींच खरेदी केलीं.

### ऑल इंडिया रेडिओचें नवीन निवासस्थान

न्यू दिल्ली येथें ऑल इंडिया रेडिओसाठी स्वतंत्र नवी इमारत बांधण्याचें ठरलें आहे आणि त्यासाठी ९ लक्ष ३० हजार रुपये मंजूर झाले आहेत.

### कोचीनमध्य विमानगृह

कोचीन येथें नवीन विमानगृह बांधण्याकरितां हिंदुस्थान-सरकार सुमारें ८ लक्ष रुपये खर्चणार आहे.

### उद्योगधंद्यांस महत्त्वाचें स्थान द्या

"हिंदुस्थानाचा मागासलेपणा व त्याचें दारिद्र्य हा उद्योगधंद्यांकडे दुर्लक्ष केल्याचा परिणाम आहे. उद्योगधंदे वाढवा, नाहींतर नष्ट व्हा ह्या बाण्यानें कार्य केलें पाहिजे. लोक साक्षर झाल्यासेरीज कोणत्याहि राष्ट्राचें उद्योगधंद्यांत दीर्घ काल पुढारीपण टिकणार नाहीं. सध्या हिंदुस्थानांतील एक दशांशहि लोक साक्षर नाहींत. हें प्रमाण निदान ७०% चें वर गेल्याविना प्रगतिपर देशांची बरोबरी आपणांस करतां येणार नाहीं. राष्ट्रीय जीवनांत उद्योगधंद्यांस योग्य तें महत्त्वाचें स्थान देणें अत्यावश्यक आहे." सर एम्. विश्वेश्वर अय्या ह्यांचें म्हैसूर येथील भाषण.

### लॉटरीच्या तिकिटांस बंदी

पोर्तुगीज हद्दींतून हिंदुस्थानांत लॉटरीचीं तिकिटें येण्यास सरकारनें बंदी केली आहे. मुंबई प्रांतांत हीं तिकिटें सर्वांत आधिक खपत असत. तिकिटांचे रूपानें जितके पैसे बाहेर जात असत, त्या मानानें बक्षिसांच्या रूपानें परत येणारी रकम अत्यल्प भरत असे.

### युद्धास सहाय

गेल्या महायुद्धांत ब्रिटिश साम्राज्यांतील किती लोक मृत्यु पावले अगर जखमी झाले, हें खालील तक्ता दर्शवितो:—

| | मृत्यु पावले | जखमी झाले |
|---|---|---|
| कॅनडा | ६२,८१७ | १,६६,१०५ |
| ऑस्ट्रेलिया | ६१,४५६ | १,५४,७२२ |
| न्यूझीलंड | १८,२१२ | ४५,९४६ |
| दक्षिण आफ्रिका | ९,७३२ | १७,८४३ |
| न्यू फौंडलंड | १,६०९ | ३,६२८ |
| वसाहती | ५९,०४४ | ७८,५३५ |
| हिंदुस्थान | ७३,४३२ | ८४,७१५ |

### ट्रेझरी बिलांवर १५ आ. ५ पै व्याज

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १५ आ. ५ पै पडला.

### कपाशीचा उठाव

"चालू वर्षी हिंदी कपाशीचें उत्पादन ६० लक्ष गाठी होईल, त्यापैकी ३५ लक्ष गाठींचा उठाव हिंदी गिरण्यांत होईल, हातमागांस ५ लक्ष गाठी लागतील, ग्रेट ब्रिटन ७ लक्ष गाठी घेईल, जपानकडे १० लक्ष गाठी जातील, शांघाईकडे ५ लक्ष गाठींची निर्गत होईल, व इतर देशांत ३ लक्ष गाठी खपतील. जपान व चीन ह्यांनीं कमी कपास घेतली, तर हिंदी कपाशीच्या उठावाचा बिकट प्रश्न उपस्थित होईल." कराची कॉटन एक्सचेंजचे उपाध्यक्ष, मि. जॉनसन, ह्यांच्या भाषणांतील उतारा.

### नफेबाजीबद्दल शिक्षा

मुंबई येथील एका केमिस्टाच्या दुकानांतील एका नोकरास एक जर्मन औषध सरकारनें ठरविल्याप्रमाणें ४ रुपयांस न विकतां ६ रुपयांस विकल्याबद्दल डिफेन्स ऑफ इंडिया नियमाखालीं चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनीं १ दिवस कैदेची व ५० रुपये दंडाची शिक्षा दिली. दुकानचे मालकास मॅजिस्ट्रेटनीं सोडून दिलें. "नोकरानें माझ्या परवानगीशिवाय ६ रुपयांस औषध विकलें व विक्रीच्या वेळीं मी दुकानांत नव्हतों" असें मालकानें कोर्टास सांगितलें.

### कपाशीची लागवड

चालू मोसमांत सबंद हिंदुस्थानांत मिळून २,१९,८२००० एकरांत कपास पेरण्यांत आली असून त्यापासून ५२,६४,००० गाठी कपास निघेल, असा सरकारी अंदाज आहे. म्हणजे, गेल्या वर्षींच्या मानानें लागवडींत ७ % व उत्पादनांत २०% वाढ दिसते.

### पगार भरमसाट नाहींत

"हिंदुस्थान सरकारच्या सप्लाय खात्यांतील नोकरांचे पगार सरास भरमसाट आहेत, अशी लोकांची समजूत आहे ती चुकीची आहे व ती दूर करण्याची खटपट करावी." अशी स्टँडिंग फिनॅन्स कमिटीची सूचना आहे.

### विमानांचा कारखाना

श्री. वालचंद हिराचंद ह्यांची विमानांच्या कारखान्याची योजना हिंदुस्थान सरकारास संमत आहे व त्या संबंधांतील वाटाघाटी लवकरच पुऱ्या होतील. ह्या कारखान्यास ४ कोटि रुपयांचें भांडवल लागेल व २०० तज्ज्ञ इंजिनिअरांच्या देखरेखीखालीं त्यांत १,२०० हुशार कामगारांस काम मिळेल.

### ४½ कोटि रुपये वारसावरील कर

ड्यूक ऑफ बेडफर्ड हे गेल्या ऑगस्टमध्यें मृत्यु पावले. त्यांनीं आपल्यामागें सुमारें ७ कोटि रुपयांची मालमत्ता ठेविली, तिचेवरील वारशावरील कराची रकम ४॥ कोटि रुपयांवर होईल.

### श्रीलंका

"वाल्मिकीचे काळापासून सिलोन बेट हें श्रीलंका ह्या नांवानें संबोधण्यांत येत आहे, तेव्हां सिलोनचें खरें नांव श्रीलंका असें आहे." असा एक ठराव सिलोन स्टेट कौन्सिलनें मंजूर केला. विधिमंडळाच्या एका कमिटीकडे हा प्रश्न सोपविण्यांत आला आहे.

### आसाम-बंगाल रेल्वे

भारतमंत्रि व आसाम-बंगाल रेल्वे कं. लि. ह्यांचेमधील करार ३१ डिसेंबर, १९४० अखेर संपत आहे, अशी नोटीस कंपनीनें प्रसिद्ध केली आहे.

### रेडिओची लोकप्रियता

नोव्हेंबर, १९४० अखेर हिंदुस्थानांत रेडिओचे एकूण १,१७,५५५ लायसेन्स चालू आहेत. म्हणजे बारा महिन्यांत त्यांत २८,२०८ ची वाढ झाली.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ६३८ | ५ लँकेशायर व हिंदुस्थान | ६४२ |
| २ युद्धाचा रागरंग | ६३९ | ६ हिंदी आगबोटींचा धंदा | ६४३ |
| ३ विचार-प्रवर्तक सहकारी बातम्या | ६४० | ७ हिंदी कपास कापडाचा धंदा | ६४३ |
| ४ स्फुट-विचार | ६४१ | ८ बेळगांव बँक लि. | ६४४ |
| नवे रुपये—कपाशीच्या बाजाराची हालहवाल—. बृहन्महाराष्ट्र शुगर सिं. ची सभा | | ९ हैंन्सार्ड | ६४५ |
| | | १० शेतकऱ्यांच्या कर्ज-फेडीचा कायदा | ६४५ |
| | | ११ निवडक बाजारभाव | ६४६ |


# अर्थ

बुधवार, ता. २५ डिसेंबर, १९४०

## युद्धाचा रागरंग

### अमेरिकेची घडाडीची मदत

इटालियन फौजांची लिबियाच्या बाजूस पिछेहाट होऊन त्यांचे हजारों कैदी ब्रिटिशांच्या हातीं लागले आहेत आणि कितीतरी युद्धसामुग्री मागें टाकून त्यांस पळून जावें लागलें आहे. ब्रिटिशांच्या या विजयाबद्दल त्यांच्यावर चोहोंकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे तें यथायोग्यच आहे. आल्बेनिया आणि उत्तर आफ्रिका येथील रणक्षेत्रांवर एकाच वेळीं मुसोलिनीस अपयश आलें आहे हा प्रस्तुत युद्धांतला अत्यंत महत्त्वाचा प्रसंग आहे. पण तो युद्धाचा निर्णायक व शेवटचा भाग आहे असें समजण्यास ब्रिटिश मुत्सद्दी तयार नाहींत; ही त्यांची सावधगिरीची भूमिका तितकीच उचित आहे. आपल्या दोस्ताच्या सैन्याची सर्वत्र धूळधाण झाली असतां आणि जमिनीवर, पाण्यांत व हवेंत त्याच्या पदरीं अपयश पडल्यामुळें हिटलरला मुसोलिनीच्या सहायास धांवावें लागणार आहे. जर्मन फौजा स्वतःच्या देशांत येऊं देण्याचे दुष्परिणाम काय होतील ह्याची जाणीव मुसोलिनीस नसेल असें नाहीं. हिटलरच्या सहायाची याचना करण्याचें शक्य तोंवर त्यानें टाळलें असलें पाहिजे आणि केवळ नाइलाज म्हणूनच मुसोलिनीनें जर्मन फौजेचा मदत मागितली असण्याचा संभव आहे. अल्बेनियांत व आफ्रिकेंत झालेल्या पराभवामुळें इटलींत असंतोष पसरणें स्वाभाविक आहे. इजिप्तच्या बाजूस मुसोलिनीनें एवढी जय्यत तयारी केली होती कीं, आपल्या फौजांस ब्रिटिशांच्या माऱ्यापुढें पलायन करावें लागेल ही गोष्ट त्याच्या स्वप्नांतहि आली नसेल. त्याचप्रमाणें, ग्रीससारखें क्षुल्लक राष्ट्र आपल्या सैन्यास मागें हाटवून आल्बेनियांत सारखी चाल करीत राहील ही कल्पना त्याच्या मनास शिवली नसेल. हिट्लरहि इटालिअन सैन्याच्या करामतीची गंमत पहात राहिला असला पाहिजे. युरोपच्या पश्चिम भागांत आपण ब्रिटिशांस गुंतवून ठेवलें आहे आणि इंग्लंडला फ्रेंचांचा असलेला आधार तुटून त्यांचा विरोधच चालला आहे. अशा स्थितींत इटलीनें युद्धांतला आपला भाग उचलावा अशी हिट्लरची अपेक्षा असल्यास तींत कांहीं नवल नाहीं. पण इटली अखेर नोंबाजलेली म्हैसच ठरली आहे असें पाहून हिट्लर आतां आपल्या दोस्ताच्या मदतीस सरसावत असावा असें दिसतें.

इटलीच्या सहायासाठीं धावत येणाऱ्या जर्मन सैन्याच्या हालचाली काय होतात हें लवकरच दिसून येईल. हिट्लर एकदां इटलींत घुसला म्हणजे त्या राष्ट्राच्या राजकीय परिस्थितीवर काय परिणाम होईल हें सांगणें कठिण आहे. त्या देशांत अंतस्थ उलाढाली होण्याचा संभव आहे. भूमध्य समुद्रांत ब्रिटिशांस त्रास देण्याचा प्रयत्न तो केल्यावांचून रहाणार नाहीं. अल्बेनियांत इटालिअन फौजांस ग्रीसच्या विरुद्ध मदत करूनच तो थांबणार नाहीं. लिबियामध्यें ढवळाढवळ करून इटलीचीं युद्धसूत्रें हातीं घेण्याचा यत्न तो करील. ह्याची चांगली कल्पना ब्रिटिश मुत्सद्द्यांस आहे आणि ह्या कारणानेंच आफ्रिकेंतील आपल्या विजयाचे बाबतींत ते सावधगिरीनें वागत आहेत, हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. ह्या विजयाचा शक्य तेवढा फायदा घेऊन इटलीस निर्बल आणि निष्प्रबळ करण्याची शिकस्त ब्रिटिश फौजा करतील आणि हिट्लरचे डावपेंच पुढें काय होणार त्यांस तोंड देण्याच्या तयारींत ते रहातील.

लिबियामध्यें ब्रिटिश आणि आल्बेनियामध्यें ग्रीक इटालियन फौजांस सारखें मागें रेटीत आहेत आणि जर्मनीचा धावा सहायासाठीं करावयाचा कीं नाहीं ह्या विचारांत मुसोलिनी आहे. इकडे हिट्लर मार्शल पेटाँ ह्यांस धाकदपटशानें फ्रेंच बंदरें व फ्रेंच आरमार स्वतःच्या हवाली करण्यास लावण्याची शिकस्त करीत आहे असें फ्रान्समधील अलीकडील हालचालींवरून दिसतें. हिट्लरच्या ह्या सर्व लटपटींकडे ब्रिटिश मुत्सद्द्यांचें लक्ष असून त्या फोल करण्याची आवश्यकता त्यांचे नजरेंतून गेलेली नाहीं. मि. चर्चिल ह्यांनीं कॉमन्स सभेंत केलेल्या भाषणांत ह्या सर्व परिस्थितीच्या जाणीवेचें प्रतिबिंब स्पष्ट उमटलेलें आढळतें. शत्रूनें शस्त्रास्त्रांचा पुरवठा चारपांच वर्षें प्रस्तुत युद्धाकरितां सहेतुक केल्यामुळें प्रारंभीं लष्करी बलाधिक्य त्याच्या बाजूस होतें. ब्रिटिश राष्ट्राचें सामर्थ्य आपल्या बरोबरीस येण्यापूर्वींच त्यास नामोहरम करून टाकावयाचें असा हिट्लरचा मूळचा बेत होता. पण तो ब्रिटिश जनतेच्या चिकाटीमुळें व धैर्यामुळें निष्फळ झाला आहे. आतां ब्रिटिशांचें लष्करी सामर्थ्य झपाट्यानें वाढत आहे आणि शस्त्रास्त्रांचा भरपूर पुरवठा असला म्हणजे ते रणांगणावर काय पराक्रम करूं शकतात हें त्यांनीं हवेंत, जमिनीवर व पाण्यांत सिद्ध करून दाखवलें आहे. पुढच्या सालांत आपलें शस्त्रास्त्रांचें बळ वाढलें म्हणजे शत्रूचा चांगला समाचार घेण्याची व युद्ध यशस्वी रीतीनें शेवटास नेण्याची आपली पूर्ण तयारी होईल हा मि. चर्चिल ह्यांनीं प्रकट केलेला आशावाद आत्मविश्वासाचा व निश्चयाचा निदर्शक आहे ह्यांत संशय नाहीं.

प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांच्या घडाडीच्या नेतृत्वाखालीं इंग्लंडला सर्व तऱ्हेचें सहाय देण्याचें अमेरिकेनें ठरवलें आहे. त्यानें ब्रिटिश राष्ट्राच्या युद्धसिद्धतेस जोराचा पाठिंबा मिळाला आहे. अमेरिकेनें आपल्या तटस्थ वृत्तीचा भंग होऊं देऊं नये आणि युद्धांत पडूं नये व तसेंच, परराष्ट्रांस माल विकावयाचा तो रोकड घेऊन विकला पाहिजे असे दोन कायदे आहेत. इंग्लंड आतांपर्यंत अमेरिकेंत रोखीनें खरेदी करीत आहे. पण ह्यापुढें सध्यापेक्षा मोठ्या विस्तृत प्रमाणावर लढाऊ विमानें, जहाजें, चिलखती गाड्या व दारूगोळा अमेरिकेकडून घ्यावा लागेल, त्याची किंमत रोखीनें

देणें शक्य नाहीं. इंग्लंडच्या आयात-निर्गत व्यापारांत अमेरिकेच्या देण्याइतक्या हुंड्या विकणार नाहींत किंवा सोनें व रोखेहि मोबदल्यांत देतां येणार नाहींत. यामुळें अमेरिकेंत इंग्लंडला कर्जच काढणें प्राप्त आहे आणि ज्यांनीं आपलें पूर्वीचें कर्ज फेडलेलें नाहीं अशा राष्ट्रांस कर्ज देणें अमेरिकन कायद्याच्या विरुद्ध आहे. पण असल्या कायद्याच्या अडचणी इंग्लंडला मदत देण्याच्या आमल्या विश्वासाच्या मार्गांत आपण येऊं देणार नाहीं असें मि. रूझवेल्ट ह्यांनीं स्पष्ट जाहीर केलें आहे. जो माल इंग्लंडला विकत देतां येत नाहीं, तो भाड्यानें देण्यास कांहींच हरकत नाहीं अशी तोड त्यांनीं काढली आहे. लढाऊ माल इंग्लंडला पुरवण्यांत अमेरिकेचा दुहेरी फायदा आहे असें त्यांचें म्हणणें आहे. जर्मनीचा पराभव आपल्या शस्त्रास्त्रांच्या सहायानें होण्यांत अमेरिकेच्या स्वातंत्र्याचें व लोकशाहीचें रक्षण होईल आणि लढाऊ सामानाच्या अमेरिकन कारखान्यांचा विस्तार होऊन आपली संरक्षणाची उत्कृष्ट तयारी होईल असा दुहेरी फायदा ह्या व्यवहारांत आहे असा मि. रूझवेल्ट ह्यांचा युक्तिवाद आहे.

---

## विचारप्रवर्तक सहकारी बातम्या

( ले.—श्री. वा. चिं. भानु )

शेतकीस दुय्यम धंदे:—आपल्या देशांत नुसत्या शेतकीवरच उदरनिर्वाह करणारे लोक पुष्कळ. पण हा शेतीचा धंदा आपल्या देशांत आर्थिक दृष्टीनें किफायतशीर होऊं शकत नाहीं. म्हणून त्याला कांहीं तरी दुय्यम धंद्याची जोड करून दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं असे विचार श्री. ना. म. जोशी यांनीं जून १९४० च्या बाम्बे को-आपरेटिव्ह क्वार्टरलीमध्यें एका लेखांत प्रकट केले आहेत. ते म्हणतात कीं 'दुय्यम धंदे' या शब्दसमूहानें प्रकट केल्या जाणाऱ्या कल्पना तो शब्द वापरणारांच्या मनोरचनेवरून किंवा प्रासंगिक आवेशावरून ठरवाव्या लागतात. वेगवेगळे इंग्रजी शब्द वेगवेगळ्या मनोरचनेचे विद्वान वापरीत असतात. हे शब्द जरी समान अर्थीच असले तरी त्यांच्या सर्वांच्या मनांत असणारा अर्थ व राजकारणी अर्थशास्त्री तोच शब्द वापरतो तेव्हां त्याच्या मनांतला अर्थ हे एकच नसतात आणि जेव्हां एखादा सरकारी अंमलदार तोच शब्द उच्चारतो तेव्हां वरील दोघा पंडितांचे मनांतल्या अर्थापेक्षा तिसरीच कांहीं कल्पना त्याचे शब्दांत आढळते. म्हणजे हे तिघेजण आपापल्या भिन्न कल्पना प्रकट करण्यास तोच शब्द वापरतात. त्यामुळें सामान्य लोकांची दिशाभूल होते. यासाठीं "दुय्यम धंदे या कल्पनेची आर्थिक, बांधेसूद, शास्त्रीय व कायदेशीर अशी परिपूर्ण व्याख्या केली पाहिजे." कोणत्याही आर्थिक हालचालीस सरकारच्या आर्थिक खात्याची सक्रिय मदत पाश्चात्य देशांत चटकन मिळते व ती तशी येथेंहि मिळाली पाहिजे.

* * *

लँड मार्गेज बँक्स, मुंबई:—मुंबई इलाख्यांतील लँड मार्गेज बँकांची एक परिषद गेल्या मार्च महिन्यांत मुंबईस भरली होती. आपल्या इलाख्यांत नव्या जुन्या मिळून १४ बँका आहेत. त्या सर्वांना मुंबई इलाखा लँड मार्गेज बँक भांडवल पुरविते. त्यामुळें साहजिकच कर्जांना या इलाखा बँकेची अखेरची मंजुरी घ्यावी लागते. लँडमार्गेज बँकांकडून कर्जे मंजूर होण्यास व नंतर तीं हातीं पडण्यास बराच अवधी लागतो अशी कर्ज मागणी करणारांची तक्रार आहे. पण कर्जमागणीच्या अर्जांत संपूर्ण माहिती पुरविणें, तारण जमिनींची समक्ष पहाणी करून उत्पन्नाचा मगदूर ठरविणें, मालकी हक्काची शहानिशा बँकेच्या कायदेशीर सल्लागारांकडून आणविणें व शेवटीं मुंबई बँकेची मंजुरी येणें व जरूर त्या भांडवलाची तरतूद करणें या कामांस अवधी हा लागणारच. कर्जांची परतफेड १५ ते २० वर्षांनीं होणार तेव्हां कर्ज-मंजुरीस ६ ते १२ महिन्यांचा अवधी लागला तर गैरवाजवी नाहीं. या बँकेचें धोरण सामान्यतः सरकारी नियंत्रणाबरहुकूमच आंखलें जातें. इलाखा बँक जिल्हा बँकांना कर्ज देते व जिल्हा बँका सभासदांना कर्ज देतात. याच प्रणालीनें जिल्हा बँकांचा व इलाखा बँकांचा वसूल होतो. अद्याप कोणाही जिल्हा बँकेकडे थकबाकी नाहीं. याचा अर्थ जिल्हा बँकेच्या सर्व सभासदांनीं वेळेवर कर्जाचे हप्ते फेडले आहेत असा मात्र करावयाचा नाहीं! जिल्हा बँकांनीं दिलेल्या कर्जांची वसुली हा एकच प्रश्न दिवसेंदिवस अवघड होतो आहे तिकडे चालकांनीं डोळेझांक करून चालणार नाहीं. या वसुलीसाठीं जिल्हा बँकांना स्वतःचे इन्स्पेक्टर्स नेमणें सर्चाचें आहे. तें परवडणार नाहीं. मध्यवर्ती जिल्हा बँकांबरोबर बोलणें करून त्यांचे मार्फत वसुली व्हावी म्हणून त्यांना कांहीं प्रमाणांत कमिशन देण्याचें ठरविल्यास जिल्हा मध्यवर्ती बँका तें काम जरूर पत्करतील. कांहीं जिल्ह्यांत प्रयोग करून पहाण्यासारखा आहे.

ऑडिट फीची आकारणी:—"इलाखा लँड मार्गेज बँक व तिच्या जिल्हा बँका यांवर त्यांच्या वार्षिक उलाढालीचे प्रमाणावर सरकारी ऑडिट फीची आकारणी व्हावी" असा एक ठराव लँड मार्गेज बँकांच्या परिषदेंत पास झाला आहे. 'ऑडिट फीचा' चंचुप्रवेश मुंबई कायदे कौन्सिलांत होत असतां जीं आश्वासनें सरकारतर्फे देण्यांत आलीं तीं पुढें सरकारनें पाळलीं नाहींत, याबद्दल प्रो. वा. गो. काळे यांनीं वेळोवेळ सरकारवर टीका केलेलीच आहे. हल्लीं ताळेबंदांत दिसणाऱ्या भांडवलाचे आकड्यांवरून त्रैराशिकानें ऑडिट फी सर्कानें वसूल करण्यांत येते. सोसायटीचें भांडवल २१ हजार असून सबंध १२ महिन्यांत ४००–५०० रुपयांची उलाढाल झाली असली, कीर्दीचे ३–४ पानेच व्यवहार झालेला असला तरी २१ हजारांवर ऑडिट फी वसूल करण्यांत येते. या दृष्टीनें लँड मार्गेज बँकांनीं केलेली विनंती सरकारनें सहानुभूतीनें मान्य करावी. 'क' व 'ड' वर्गांतील शेतकी सोसायट्यांवर सुद्धा ऑडिट फीची आकारणी भांडवलाच्या मुतवत आकड्यांवरून न करितां झालेल्या उलाढालीवरून करावी असें येथें सुचविल्यास तें स्वाहीनें अस्थानी होणार नाहीं. त्याचप्रमाणें 'खेळतें भांडवल' याचा खरा अर्थ बदलून ज्यांत हालचाल होते आहे अशाच बाबींचा समावेश त्यांत व्हावा. खंडानें न गेलेल्या जमिनींच्या रकमा, साखेसाखचे तोटे, व संशयित आणि बुडित कर्जें यांचा समावेश 'खेळतें भांडवल' यांत होऊं नये तशी तजवीज केली गेली तर ऑडिट फीचा कर जाचणार नाहीं.

---

# स्फुट विचार

## नवे रुपये

रुपयाचें नाणें जरूरीपेक्षा अधिक प्रमाणांत संग्रहीं ठेवण्याची प्रवृत्ति कांहीं महिन्यांमागें जनतेमध्यें दिसून आल्यानें एक रुपये किंमतीच्या नोटा प्रचलित करून त्यांस नाण्यांचें कायदेशीर स्वरूप दिलें ही गोष्ट आमच्या वाचकांस माहीतच आहे. नित्याच्या व्यवहारास लागणारें रुपयाचें नाणें लोकांस भरपूर मिळावें. परंतु घाबरटपणानें किंवा अपमतलबीपणानें कोणीहि त्याची फाजील साठवण करूं नये हा त्या धोरणाचा मुख्य हेतु होता. नाणीं वापरण्यासाठी आहेत, साठवणीसाठी नाहींत आणि त्यांचा संग्रह करणें हें सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें निष्कारण खर्चाचें व अनिष्ट आहे हें त्या धोरणाचें समर्थन होतें. टांकसाळींत सरकारनें रुपये पाडावयाचे आणि ते लोकांच्या संग्रहीं पडून रहावयाचे ह्यांत कोणाचाहि फायदा नसून सर्वांचें नुकसानच आहे. तथापि जनतेच्या सोयीसाठी रुपयाचें नाणें पाहिजेच असें अनुभवास आल्यास तें पुरवणें सरकारचें व रिझर्व्ह बँकेचें कर्तव्य ठरतें. त्याप्रमाणें जादा रुपये पाडून ते प्रचलित करण्याचें हिंदुस्थान सरकारनें आतां ठरवलें असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. युद्धकाळांत व्यापारी उलाढाली अधिक मोठ्या प्रमाणावर होतात आणि त्यांमध्यें नाण्यांची अधिक जरूर भासते. त्याचप्रमाणें, एक रुपयाच्या नोटा खेडेगावीं विभागांत वापरण्यांत गैरसोयीच्या होतात असाहि अनुभव येत आहे. आतां जे नवे रुपये पाडण्यांत येत आहेत त्यांचा आकार आणि वजन हीं जुन्या नाण्यांप्रमाणेंच राहील. बनावट नाणीं करतां येणें अवघड व्हावें ह्या हेतूनें नवीन रुपयाच्या कडा विशिष्ट घाटाच्या करण्याची व्यवस्था झाली आहे. तथापि त्यामध्यें महत्त्वाचा फरक करण्यांत आला आहे, तो रुपया मधील शुद्ध चांदीच्या प्रमाणाविषयींचा आहे. जुन्या रुपयांत अकरा-बारांश शुद्ध चांदी व एक बारांश हलके धातु असें मिश्रण आहे; नवीन रुपयांत निम्मी चांदी व निम्मे हलके धातु असें प्रमाण आहे. रुपया हें प्रमाणभूत नाणें नाहीं आणि त्यामध्यें त्याच्या व्यवहारांतील किंमती इतकी चांदी असण्याचें कारण नाहीं. "रुपया ही चांदीच्या तुकड्यावर छापलेली एक नोटच आहे" असें म्हणण्यांत येतें त्याचें रहस्य ध्यानांत येणें आवश्यक आहे. नवीन रुपयांत चांदीचें प्रमाण कमी केल्यानें त्याचें चलन ह्या नात्याचें स्वरूप कायम रहातें, त्यांत कांहींच बदल होत नाहीं. अधिक रुपये पाडले जातील त्यास खर्च कमी येईल आणि त्यांचे योगानें व्यवहारांत भासणारी नाण्यांची कमतरता दूर होईल.

## कपाशीच्या बाजाराची हालहवाल

कपाशीचा हंगाम आतां चालू झाल्या कारणानें तिच्या बाजारभावांच्या हालचालींकडे धंदेवाले व शेतकरी वर्ग यांचे डोळे लागून रहाणें स्वाभाविक आहे. गेल्या आठवड्याचे असेर भडोच कापसाचा भाव मंदीची प्रवृत्ति दर्शवित होता. युद्धाच्या दररोज येणाऱ्या बातम्यांचा बाजारावर परिणाम नित्यच होत असतो. तथापि, हिंदी कापसास बाहेर देशांत येणारी मागणी आणि त्याला स्वदेशी गिरण्यांत होणारा उठाव ह्यांचा एकूण पुरवठ्याशी होणारा संबंध हाच असेर बाजारभावाचा निर्णायक ठरला पाहिजे. बाहेरच्या बाजारांत कमी येणारी मागणी पूर्णपणानें भरून काढण्याचें सामर्थ्य हिंदी गिरण्यांमध्यें नाहीं ही गोष्ट खरी आहे. तथापि, कापसाच्या परिस्थितीची छाननी केली असतां खालीं दिलेल्या गोष्टी ध्यानांत येतात. कापसाच्या धंद्यांतील तज्ज्ञांच्या हिशेबाप्रमाणें चालू हंगामांत हिंदी कपाशीचें पीक ६० लक्ष गाठी होईल. त्यांपैकी ३५ लक्ष गाठी हिंदी गिरण्यांत खपतील. हातमागासाठीं ५ लक्ष गाठींची जरूर लागेल. ग्रेटब्रिटन ७ लक्ष, जपान १० लक्ष, शांघाय ५ लक्ष व इतर देश २ लक्ष, ह्याप्रमाणें गाठींच्या निर्गतीची वांटणी होईल. ह्या अंदाजाप्रमाणें कपाशीच्या सबंद उत्पादनास गिऱ्हाईक मिळेल. बाहेरच्या देशांनीं अपेक्षेप्रमाणें हिन्दी कापसाची उचल केली नाहीं तर मागणीच्या मानानें पुरवठा अधिक होऊन ह्या तफावतीचा परिणाम बाजारभावांवर प्रतिकूल होईल. आपापल्या कल्पनेप्रमाणें व्यापारी कापसाच्या किंमतीचा आणि त्याच्या धंद्याच्या परिस्थितीचा अंदाज बांधतात आणि त्याचाहि परिणाम बाजारांवर होत असतो. युद्धपरिस्थितीच्या अनिश्चितपणावर इलाज उपयोगांत आणतां येणें शक्य नसलें तरी कपाशीसारख्या मालाच्या किंमती निष्कारण खालीं जाणार नाहींत ह्याविषयीं त्यासंबंधांतल्या धंदेवाल्यांनीं खबरदारी घेतली पाहिजे.

## बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटची वार्षिक सभा

बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटची सहावी वार्षिक साधारण सभा गेल्या रविवारीं दि. ब. एन. सी. लिमये ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. तीमध्यें ३० सप्टेंबर, १९४० असेरचा वार्षिक अहवाल व हिशेब ह्यास मंजुरी मिळून प्रेफरन्स भागांवर ५% व ऑर्डिनरी भागांवर ६% डिव्हिडंड देण्याचें ठरलें. प्रो. वा. गो. काळे, दि. ब. लिमये, श्री. र. चिं. सोहनी व श्री. कोंडे देशमुख हे डायरेक्टर्स पाळीप्रमाणें निवृत्त झाले. त्यांपैकी प्रो. काळे ह्यांनीं आपण फेरनिवडणुकीस उभें राहत नाहीं असें सांगितल्यावरून त्यांचे जागीं प्रिन्सिपॉल व्ही. जी. गोखले ह्यांची निवडणूक झाली. बाकीचे निवृत्त होणारे डायरेक्टर पुनः निवडून आले. मेसर्स जी. एम्. ओक आणि कंपनी व मेसर्स बाटलीबॉय आणि पुरोहित ह्यांस नवीन वर्षाकरितां ऑडिटर्स नेमण्यांत आलें. प्रि. गोखले ह्यांनीं आपल्या भाषणांत प्रो. काळे ह्यांनीं सिंडिकेटकरितां केलेल्या कार्याचा गौरवपूर्वक उल्लेख करून भागीदारांतर्फे त्यांचे त्याबद्दल आभार मानले. २२ जानेवारीनंतर भागीदारांस डिव्हिडंड देण्यांत येईल.

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें.

सदर बँकेच्या मुख्य कचेरीच्या

**कामाच्या वेळांत बदल**

या बँकेच्या मुख्य कचेरीच्या कामाच्या वेळा सुटीखेरीज इतर दिवशीं १० ते ३ चे ऐवजीं १०-१५ ते २-४५ व शनिवारीं १० ते १२-३० चे ऐवजी १०-१५ ते १ अशा करण्यांत आल्या आहेत.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

## लँकेशायर व हिंदुस्थान

"लँकेशायरच्या कापड गिरण्यांपुढे निर्गत व्यापाराचा प्रश्न उभा आहे, परंतु त्यांत हिंदुस्थान व पूर्व आशिया ह्यांकडे निर्गत पूर्ववत कशी सुरू होईल, हा मुद्दा विशेष महत्त्वाचा आहे. युद्धास प्रारंभ होण्यापूर्वी कांहीं वर्षे ह्या बाजारपेठांतील लँकेशायर कापडाचा उठाव कमी कमी होत चालला होता. स्थानिक गिरण्यांची कार्यक्षमता वाढत आहे, त्यांच्या मालाचा दर्जा सुधारत आहे व उत्पादनाचा खर्चहि कमी होऊं लागला आहे. तेथील सरकारांनीं स्थानिक खपास संरक्षक जकातींचें संरक्षण दिलें आहे व निर्गत व्यापारास इतर मार्गांनीं सहाय केलें आहे. ह्या प्रतिकूल परिस्थितींतहि लँकेशायरनें आपला व्यापार कायम राखण्याची पराकाष्ठा केली आहे. लँकेशायरनें आपल्या मालाची किंमत स्थानिक गिरण्यांच्या कापडाच्या किंमतींच्या बरोबरीस आणून अगर त्यापेक्षा खाली आणून स्पर्धा केलेली नाहीं. लँकेशायरच्या मालास अधिक किंमत देण्यास गिऱ्हाइक तयार असतें व ह्या गोष्टीवरच लँकेशायरचा व्यापार आधारलेला आहे. तथापि, हिंदुस्थान आणि पूर्व एशिया येथील गिऱ्हाइक पैशानें अत्यंत गरीब असल्यारणानें लँकेशायरच्या मालास कांहीं मर्यादेपलीकडे जास्त किंमत न येणें अपरिहार्य होतें. युद्धामुळें रहाणीचा खर्च वाढल्यामुळें ह्या गिऱ्हाइकांनीं आपल्या प्रतिस्पर्ध्यांचें स्वस्त कापड घेण्यास प्रारंभ केला. ह्याचा अर्थ असा कीं अल्पावधींत लँकेशायरचा व्यापार बसला. वक्तशीरपणें मालाचा पुरवठा करण्याचें लँकेशायरचें वैशिष्ट्यहि टिकणें कठीण झालें. एशियाची युरोपांतील बाजारपेठ बंद झाल्याकारणानें, तेथें होणारी कच्च्या मालाची विक्री बंद पडली आहे, त्याचा परिणाम एशियांतील आर्थिक परिस्थितीवर झाला आहे. हिंदुस्थानांत स्थानिक उत्पादनास मागणी फार थोडी आहे व त्यामुळें हिंदी बनावटीचा माल आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यापासून ऑस्ट्रेलियापर्यंतच्या सर्व देशांत विक्रीसाठीं येऊं लागला आहे आणि त्या कारणानें लँकेशायरचा तेथील खप कमी होत आहे. लँकेशायरला पूर्व गोलार्धांतील व्यापार ह्यापुढें नको असेल तरच सद्यःस्थितीकडे दुर्लक्ष करून भागेल. परंतु तसें घडल्यास, लँकेशायरला व ग्रेट-ब्रिटनला त्याचा दुष्परिणाम भोगावा लागेल. तेव्हां; हा प्रश्न सोडविण्याची शक्य ती सर्व खटपट केलीच पाहिजे" लँकेशायरच्या कॉटन मर्चंटस असोसिएशनचे अध्यक्ष, मि. पॅरडो, ह्यांनीं मँचेस्टर गार्डियन साप्ताहिकांतील आपल्या लेखांत वरील इषारा दिला आहे.

### निर्गत व्यापार वाढविण्याचे प्रयत्न

ह्या साप्ताहिकाचे संपादक त्या संबंधांत लिहितात:—"युरोपचा बहुतेक भाग आतां व्यापारास उपयोगी उरलेला नाहीं. मोठ्या फ्रेंच सैन्यास कपडेलत्ते पुरवावे लागत नसल्यामुळें, ग्रेट-ब्रिटनजवळ निर्गत व्यापारासाठीं अधिक माल उपलब्ध आहे व वक्तशीरपणें माल पाठविणें आतां सोपें झालें आहे. उत्पादनशक्तीची कमतरता नाहीं; गिऱ्हाइक व विक्रेता ह्यांस जोडणारा दुवा मात्र पाहिजे आहे. ब्रिटिश कापड कारखान्यांचा ह्या दृष्टीनें प्रयत्न चालू आहे. ग्रेटब्रिटनमधील उठाव नियंत्रित केला आहे, त्याचा हेतु निर्गतीस हवा तेवढा माल उपलब्ध व्हावा, हाच आहे."

---

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

### शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## हिंदी आगबोटींचा धंदा

हिंदुस्थानाच्या किनाऱ्याची एकूण लांबी सुमारें ४½ हजार मैल आहे. सुमारें ७० लक्ष टन मालाची वहातुक ह्या किनाऱ्यावर होते. ह्याखेरीज पश्चिम किनाऱ्यावर १५ लक्ष उतारू व हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांचे दरम्यान १ लक्ष उतारू आगबोटींनीं प्रवास करतात. हिंदुस्थान् व परदेश ह्यांचे दरम्यान दरसाल २½ कोटि टन माल व २ लक्ष उतारू ह्यांची वहातुक होते.

हिंदी किनाऱ्यावरील वहातुकींपैकीं फक्त २१ ते २२% वहातुक हिंदी आगबोटींतून होते. परराष्ट्रांशीं होणाऱ्या वहातुकींत हिंदी आगबोटीस वाटा नाहीं. सर्व हिंदी कंपन्यांचे जवळ मिळून १,२१,७४८ टनांच्या आगबोटी खालील प्रमाणें आहेतः—

| कंपनीचें नांव | टन | आगबोटींची संख्या |
|---|---|---|
| शिंधा स्टीम | ९८,८१२ | २३ |
| बॉबे स्टीम | १३,२९९ | १५ |
| बेंगॉल बर्मा स्टीम | ५,२०९ | ३ |
| ई. को. नॅव्हिगेशन ॲन्ड ट्रेडिंग | १,६०५ | ६ |
| रत्नाकर स्टीम | ५९० | १ |
| ईस्टर्न स्टीम | २,१४४ | २ |
| मलबार स्टीम | १,६३३ | ३ |
| मर्चंट स्टीम | ४,४७४ | ४ |
| कावसजी दिनशा ब्रदर्स | ३,६७२ | ५ |
| हिंदुस्थान स्टीम | ३१० | १ |
| | १,२१,७४८ | ६३ |

ग्रेटब्रिटनच्या व्यापारी आगबोटी एकूण १ कोटि, ७९ लक्ष टनांच्या आहेत. हिंदी किनाऱ्यावरील ७९% व्यापारी वहातुक ब्रिटिश आगबोटींतून होते व २७½ लक्ष टनांच्या ब्रिटिश आगबोटी हिंदी परराष्ट्रीय व्यापारी मालाची ने-आण करीत आहेत. एकूण ब्रिटिश परराष्ट्रीय व्यापार हिंदी परराष्ट्रीय व्यापाराच्या ५½ पट आहे. परंतु ब्रिटिश व्यापारी आगबोटी मात्र १२५ पट आहेत. ग्रेटब्रिटन आपल्या आगबोट-वहातुकीस प्रोत्साहन देत असून व्यापारी वाटाघाटींत मालाच्या वहातुकीचे बाबतींत ब्रिटिश हितसंबंधांस प्राधान्य देण्याचें त्या राष्ट्राचें धोरण आहे.

### स्वदेशी आगबोटी

हिंदी मालकीच्या आगबोटींच्या धंद्याकडे सरकारचें लक्ष वेधण्याचा प्रयत्न शिंधा स्टीम नॅव्हिगेशन कंपनी व श्री. वालचंद हिराचंद हे गेलीं कित्येक वर्षे करीत आले आहेत. विजगापट्टम येथें आगबोटी बांधण्याची वालचंद शेठजींची योजना असून तिला हिंदुस्थान सरकार आतां सहाय करणार आहे. ८,००० ते १२,००० टनांच्या आगबोटी तेथें तयार केल्या जातील. एका वर्षांत अशा सुमारें १६ आगबोटी तयार होतील, त्यांस ४ कोटि रुपये खर्च येईल. प्रारंभीं, अर्थातच विदेशी तज्ञांचे देखरेखीखालीच हें काम करावें लागेल. श्री. वालचंद हिराचंद ह्यांच्या विमानांच्या कारखान्यासहि लवकर सरकारी सहायानें प्रारंभ होणार आहे. मोटारींच्या कारखान्याची योजना मात्र मागें पडली आहे.

## हिंदी कपास कापडाचा धंदा

(कापडाचें उत्पादन, आयात, कपाशीचा उठाव, गिरण्यांतील कामगारांची संख्या, गिरण्यांची संख्या व देशी कापडाची निर्गत.)

| वर्ष ३१ मार्च अखेर | कापडाचें उत्पादन (कोटि वार) गिरण्या | हातमाग | एकूण |
|---|---|---|---|
| १९१३–१४ | ११६ | १०७ | २२३ |
| १९१९–२० | १६४ | ५६ | २२० |
| १९२७–२८ | २३५ | १३१ | ३६६ |
| १९३६–३७ | ३५७ | १४९ | ५०६ |
| १९३७–३८ | ४०८ | १४८ | ५५६ |
| १९३८–३९ | ४२६ | १६० | ५८६ |

| वर्ष | कापडाची आयात: किंमत कोटि रु. | कोटि वार | कपाशीचा उठाव (लक्ष गांठी): हिंदी | विदेशी व हिंदी मिळून |
|---|---|---|---|---|
| १९१३–१४ | ६२·१ | ३२० | ... | २१·४ |
| १९१९–२० | ५४·७ | १०८ | ... | १९·५ |
| १९२७–२८ | ५८·३ | १९७ | १७·७ | २०·१ |
| १९३६–३७ | १२·० | ६९ | २६·२ | ३१·५ |
| १९३७–३८ | ११·७ | ५९ | २९·९ | ३६·६ |
| १९३८–३९ | १०·३ | ६४ | ३१·२ | ३८·१ |

| वर्ष | गिरण्यांतील कामगार लक्ष | गिरण्यांची संख्या | हिंदी कापडाची निर्गत (लक्ष वार) |
|---|---|---|---|
| १९१३–१४ | २·६ | २७१ | ८९२ |
| १९१९–२० | ३·१ | २५३ | १९६५ |
| १९२७–२८ | ३·६ | ३९५ | १६८६ |
| १९३६–३७ | ४·२ | ३७० | १९०९ |
| १९३७–३८ | ४·४ | ३८० | २४१२ |
| १९३८–३९ | ४·४ | ३८९ | १७७० |

### हिंदी कपाशीचें उत्पादन

(लक्ष गांठी)

| १९२८–२९ | १९२९–३० | १९३०–३१ | १९३१–३२ | १९३२–३३ | १९३३–३४ | १९३४–३५ | १९३५–३६ | १९३६–३७ | १९३७–३८ | १० वर्षांची सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५८ | ५२ | ९२ | ४० | ४७ | ५१ | ४९ | ५९ | ६२ | ५८ | ५२·८ |

### दि बेळगांव बँक लि. बेळगांव

बेळगांव येथील पहिली जॉइंट स्टॉक बँक दि बेळगांव बँक लि. बेळगांव यांच्या पहिल्या शाखेचा उद्घाटनसमारंभ संकेश्वर येथें तेथील प्रसिद्ध व्यापारी रा. रेवणसिद्दापा कणगले यांच्या पेठेंतील भव्य इमारतींत रा. बी. बी. ममदापूर (माजी चेअरमन दि बेळगांव डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. बेळगांव व हेडमास्तर जी. ए. हायस्कूल) यांचे अध्यक्षतेखाली मोठ्या समारंभानें ता. १–१२–४० रविवार रोजीं सकाळीं ९॥ वाजतां मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. सदर प्रसंगीं तेथील प्रमुख व्यापारी रा. रेवणसिद्दापा कणगले, रा. पट्टणशेट्टी, रा. नलावडे, रा. वासुदेवराव भिडे, रा. चन्नापा केस्ती वगैरे व्यापारी व इतर गांवांतील प्रमुख मंडळी मिळून चारपांचशें जनसमुदाय हजर होता. सदर समारंभाकरितां बेळगांवहून रा. लिंगी विरुपाक्ष देशपांडे रा. विराप्पाणा उप्पीन, रा. नाईक वकील, रा. सराफ वकील, रा. गंगाधरराव कुलकर्णी, रा. दंडगे वगैरे बँकेचे डायरेक्टर्स व बँकेचा नोकरवर्ग हजर असून, तसेंच मुद्दाम या समारंभास हुकेरीहून रा. विष्णूपंत कुलकर्णी वकील, रा. बेटगिरी वकील वगैरे प्रतिष्ठित मंडळी आली होती. सदर प्रसंगींच रा. कणगले, रा. पट्टणशेट्टी, रा. भिडे वगैरे मंडळींनीं बँकेचे सहा ते सात हजार रुपयांचे शेअर्स खरेदी केले.

### को. पीपल्स बँक लि. लिंब (जि. सातारा)

को. पी. बँकेची वार्षिक जनरल सभा ता. २०।९।४० रोजीं श्री. बापूसाहेब आपटे यांचे अध्यक्षतेखाली झाली. सभासद, ठेवीदार व हितचिंतक मिळून १००।१२५ मंडळी सभेस हजर होती. अहवाल व ताळेबंद मंजूर झाले, त्यांत यंदा बँकेस ७२४८८२ नफा झाल्याचें जाहीर करण्यांत आलें. वेळेवर कर्जफेड न झाल्यानें थकबाकी वाढत आहे, म्हणून यंदा नफ्याची वाटणी न करतां तो तसाच शिल्लक ठेवावा असें ठरलें. पुढील सालासाठीं श्री. त्र्यं. मा. ठाकूर, हे प्रेसिडेंट, १ का. वा. चितळे, २ ग. कु. सावत, ३ नथु गणु कुस्पे ४ आण्णा दगडु शिंदे हे पंचकमिटीचे सभासद व रा. अभ्यंकर यांची सेक्रेटरी म्हणून निवड झाल्यावर अल्पाहार होऊन सभा पार पडली.

### अमेरिकेंतील गांवांचीं नांवें

अमेरिकेमध्यें रोम ह्या नांवाचीं २५, बर्लिन ह्या नांवाचीं २९, हॅंबर्ग ह्या नांवाचीं १० व मिलन ह्या नांवाचीं १२ गांवें आहेत. मेन ह्या गांवांतील एका खांबावर खालीलप्रमाणें पाटी आहे:— नॉर्वे: १४ मैल; पॅरिस: १५ मैल; डेन्मार्क: २३ मैल; नेपल्स: २३ मैल; स्वीडन: २५ मैल; पोलंड: २७ मैल; मेक्सिको: ३७ मैल; पेरू: ४६ मैल; चीन: ९४ मैल. हीं सर्व न्यू इंग्लंडमधील गांवें आहेत.

'अर्थ' ग्रन्थमाला

## बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ता:—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बँक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

### "हॅन्सार्ड"

ब्रिटिश पार्लमेंटमधील कामकाजाचे वृत्तांत हिंदुस्थानांतील कायदेमंडळांच्या रिपोर्टासारखेच प्रसिद्ध होत असतात आणि ते 'हॅन्सार्ड' ह्या नांवानें सुप्रसिद्ध आहेत. ब्रिटिश हॅन्सार्डच्या धर्तीवरच ह्या देशांतील कायदेमंडळांचे रिपोर्ट प्रसिद्ध केले जातात. हॅन्सार्डचे रिपोर्ट ब्रिटिश सरकार छापून प्रसिद्ध करतें आणि ह्या कामीं दर वर्षी त्यास सुमारें चार लक्ष रुपये खर्च येतो. पार्लमेंटच्या सभासदांस त्याच्या प्रती फुकट मिळतात, पण इतरांस एका प्रतीस सहा पेन्स किंमत द्यावी लागते. हॅन्सार्डच्या सुमारें तेराशे प्रती खपतात आणि त्यांचे सुमारें सत्तर-ऐंशी हजार रुपये वसूल होतात, बाकीचा खर्च सरकारच्या अंगावर पडतो. पार्लमेंटचें काम चालू असतांना हॅन्सार्डसाठी लघुलेखक आळीपाळीनें दर वीस मिनिटांस बदलत जाऊन भाषणें टिपून घेतात. ह्या लघुलेखनाच्या सविस्तर प्रती टंक यंत्रावर तात्काळ तयार केल्या जातात आणि त्या तशाच शेजारी असलेल्या मुद्रणालयांत जातात. थोड्याच तासांत रिपोर्ट छापून तयार होतात आणि त्याच्या प्रती वाचकांच्या हातांत पडतात. ह्या हॅन्सार्ड रिपोर्टांचा मूळ उत्पादक "ल्यूक हॅन्सार्ड" ह्या नांवाचा खिळे जुळवणारा छापखान्यांतला सामान्य कामगार होता. आपल्या हुशारीनें हळुहळु ह्या धंद्यांत तो पुढें आला आणि त्यास छापण्याचें काम प्रसिद्ध लेखकांकडून मिळूं लागलें. पार्लमेंटांतील भाषणांचे रिपोर्ट तो छापून प्रसिद्ध करूं लागला आणि त्यास ह्या कामांत चांगलें यश मिळालें. हॅन्सार्डनें पुष्कळ संपत्ति मिळविली, पण पार्लमेंटचे रिपोर्ट छापण्यांत फायदा होत नसे आणि म्हणून पार्लमेंटनें त्यास खर्च भागण्यासाठीं द्रव्यसहाय्य देण्याचें ठरवलें. हें छापण्याचें काम आतां सरकारमार्फत होतें, पण रिपोर्टास "हॅन्सार्ड" चें नांव अजूनहि कायम राहिलें आहे.

---

### शेतकऱ्यांच्या कर्जफेडीच्या कायद्याचा अंमल

(ले.—विनायक गणेश लिखे)

"या कायद्याखालील कानू लवकरच प्रसिद्ध करण्यांत येतील आणि कानूंना अखेरची मंजुरी मिळून कायदा लवकरच अंमलांत आणण्यांत येईल" अशा अर्थाचा रेव्हेन्यू सेक्रेटरीकडून आलेला खुलासा आम्हीं मागें प्रसिद्ध केला होता. त्याप्रमाणें सरकारी गॅझेट भाग ४ अ ता. ५ डिसेंबर सन १९४० पान ११९७ ते १२३५ यामध्यें सदरचे कानू आणि फार्म्स प्रसिद्ध झाले आहेत. हे कानू मंजूर झाले म्हणजे हा कायदा लवकरच अंमलांत येईल असें निश्चित समजावें.

प्रथम हे कानू चांगल्या रीतीनें समजून घेतले पाहिजेत. ज्यांचा ज्यांचा या कायद्याशीं संबंध येणार आहे अशा सर्व लोकांनीं मग ते कर्जदार शेतकरी असोत, सावकार असोत अगर सहकारी संस्था असोत, त्या सर्वांनीं हे कानू समजावून घेतले पाहिजेत व आपआपल्या सूचना मुंबई सरकारकडे ता. ३१ माहे जानेवारी सन १९४१ पावेतों पोचतील असें केलें पाहिजे.

प्रसिद्ध झालेले कानू आणि फार्म्स बरेच आहेत ते नीट समजावून घेतले पाहिजेत. त्याच्या करितां मूळ कायदा चांगल्या रीतीनें समजून घेतला पाहिजे.

फेब्रुवारी सन १९४१ मध्यें कानूंना मंजुरी मिळेल. आणि ता. १ एप्रील सन १९४१ पासून कायदा सुरू होईल असें गृहीत धरून ज्यानें त्यानें आपआपल्या व्यवहाराचें धोरण आंखून ठेवावें.


दि गुड-वुइल
अॅशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारांस
भरपूर सवलती माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंट्स नेमणें आहेत.

पत्रव्यवहार करावा
हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा.

मॅनेजिंग डायरेक्टर

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
OUR HOME
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक
निवास भोजनालयांत
उतरण्यास या.
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ... ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ३% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११२—६ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—६ |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९४—० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०२—२ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९३—० |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९५—१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०६—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०७—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... .. | ११८—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १३७—४ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०३–१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ४०—४ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५८५—० |
| बाँबे मॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०५—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १३०—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | ११३—४ |
| पुणे इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १४८५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १६४२—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | ९८—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ३½% ... ... | ६०—० |
| अहमदाबाद प्रांतीज (५००) ११½% | ९९५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ७०२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २१९—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४५–१२ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २०—२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ४०—२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ३८००—० |
| टाटा आयर्न प्र. पे. ( १५० ) ६% ... ... | २१०—० |
| टाटा आयर्न दु. पे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १४९—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३६९—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | १८८०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | ११७—० |

#### सोने–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( शिद ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४१-१३-६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ९ -१२-६ |


दि
# बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर-विक्री चालू आहे

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट
पुणें शाखा — डेक्कन जिमखाना






# मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, दरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.



## दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस

"जौहरे कुश्त" या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हा कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. या औषधाच्या प्रसिद्धीसाठी प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हे घड्याळ अत्यंत सुंदर व मजबूत आहे. सौंदर्य व मजबुती या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.


सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारास टपाल हंशिल माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.

पत्ता:—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. १७ (A. P.) अमृतसर-Amritsar

# फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट

१९४० चें मॉडेल
ऑटोमॅटिक
रिव्हॉल्व्हर




लायसेन्सची जरूर
नाहीं

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखवल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून ह्याचा तसाच आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ३५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्ट्यासह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हंशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बक्षिस दिली जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारांस सहा घड्याळें बक्षिस आणि टपाल हंशिल माफ.

पत्ताः—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर (India.)

---

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

---

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.



कामगार ब्राम्ही तेल
शिरोमणि तेल
आवळ्याचे तेल
स्थापना १९०६
डोकें शांत रहातें, केंस मजबूत होतात.
पळण्याचे बंद होतात व मऊ रहातात.
धी बॉम्बे कलकत्ता ट्रेडींग कं. (मुंबई नं. ४)

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत [illegible]
ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६७ रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स अॅकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**For Collegians**
**Wooden & Iron Furniture**
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
**SHEVAK BROS.**

| *Work-Shop Address*: | *Branch No. 1* |
| --- | --- |
| 153 Kasaba. | Shevak Quarters, near Fergusson College |
| Poona 2 | Poona 4 |

**'अर्थ' ग्रन्थमाला.**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

**अर्थशास्त्र**
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**महायुद्धाची जाणीव!** कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनी छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.